# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## महा मेट्रोच्या नवीन सिग्नलिंग लॅब आणि असेंब्ली सेंटरची व्यवस्थापकीय संचालक यांनी केली पाहणी



नागपूर: नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या फेज–II मध्ये उपकरण चाचणी, असेंब्ली आणि गुणवत्ता नियंत्रणाच्या वाढत्या गरजांना पूरक ठरेल असे अत्याधुनिक सिग्नलिंग लॅबोरेटरी आणि असेंब्ली सेंटर महा मेट्रो नागपूरकडून हिंगणा डेपो येथे स्थापन करण्यात आले आहे.

महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांनी नव्याने विकसित करण्यात आलेल्या या सुविधेची पाहणी केली. यावेळी श्री. व्ही. के. अग्रवाल – संचालक (सिस्टीम्स अॅ ण्ड ऑपरेशन्स), श्री. अनिलकुमार कोकाटे – संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग), श्री. राजीव त्यागी – संचालक (प्रकल्प),

तसेच महा मेट्रो आणि सिमेन्स इंडिया लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या नव्या युनिटची निर्मिती मेट्रो रेल सिग्नलिंग सिस्टीममध्ये वापरल्या जाणाऱ्या विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक घटकांच्या असेंब्ली व चाचणी प्रक्रियेचे सुव्यवस्थापन करण्यासाठी करण्यात आली आहे. या सुविधेमुळे मेट्रो रेल्वे सिग्नलिंग मानकांचे पालन, विद्युत सुरक्षा नियमांचे अनुपालन आणि जागतिक दर्जाच्या गुणवत्ता निकषांची अंमलबजावणी सुनिश्चित होईल.

या नव्या केंद्रामुळे पूर्व-असेंबल आणि पूर्व-चाचणी केलेले उपकरण उपलब्ध होणार असल्याने प्रत्यक्ष प्रकल्प ठिकाणी होणाऱ्या बसवणीच्या वेळेत मोठी बचत होईल. यापूर्वी या कामांसाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांना मेट्रो कॉरिडॉरच्या विस्तृत पट्ट्यात तैनात करावे लागत होते. या केंद्रीकृत युनिटमुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक कार्यक्षम, अचूक आणि ट्रेसेबिलिटीसह पूर्ण होऊ शकणार आहे.

कॅलिब्रेटेड उपकरणे, विशेष मशीनरी आणि प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी वर्गाने सज्ज असलेल्या या केंद्रामध्ये उपकरण प्रकल्पस्थळी पाठवण्यापूर्वी फंक्शनल टेस्टिंग आणि गुणवत्ता तपासणी केली जाणार आहे. यामुळे सिस्टीमची विश्वासार्हता वाढण्यास मदत होणार असून, फेज–II च्या अंमलबजावणीला गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

हे केंद्र ऑपरेशन्स आणि मेंटेनन्स पथकांसाठी प्रशिक्षण व कौशल्यवर्धन केंद्र म्हणूनही कार्य करणार आहे. नियंत्रित वातावरणात प्रत्यक्ष उपकरणांवर काम करण्याचा अनुभव मिळाल्याने तांत्रिक कौशल्य अधिक दृढ होईल आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील कामासाठी तयारी वाढेल.

महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, नव्याने स्थापन करण्यात आलेले सिग्नलिंग लॅबोरेटरी आणि असेंब्ली सेंटर हे ऑपरेशनल कार्यक्षमतेत वाढ, गुणवत्ता अनुपालन सुनिश्चित करणे आणि नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या वेळेवर अंमलबजावणीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.



